# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शैक्षणिक विभाग

## परिपत्रक

विषय : स्थानिक निवड समितीने शिफारस करून नियुक्त केलेल्या उमेदवारांचे व तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करण्याबाबत...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी नियुक्त करून शिफारस केलेल्या उमेदवारांना कायमस्वरुपी/शैक्षणिक वर्षासाठी/तासिका तत्वावर शिक्षक मान्यता शैक्षणिक विभागाकडून देण्यात येते. यासंदर्भात अध्यापकांना परिनियम क्र. ४१५ मध्ये महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील रिक्त शिक्षकी पदे कायमस्वरूपी भरण्याची तरतुद नमूद केलेली आहे व तात्पुरत्या स्वरुपामध्ये जी रिक्त पदे भरावयाची आहेत, त्याबाबतचा उल्लेख परिनियम क्र. ४१५(३) मध्ये केलेला आहे.

यासंदर्भात शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या उमेदवारांचे निवड समिती अहवाल, शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव व तासिका तत्वावरील नेमणूक केलेल्या उमेदवारांचे प्रस्ताव खालील मुद्यांप्रमाणे शैक्षणिक विभागात सादर करण्यात यावेत.

१) शैक्षणिक वर्ष २०२१–२२ या वर्षासाठी स्थानिक निवड समितीने नेमणूक केलेल्या उमेदवारांच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहित प्रक्रिया पूर्ण करून **दि. ३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरून विद्यापीठात सादर करणे** आवश्यक आहे. दि. ३० सप्टेंबर, २०२१ नंतर स्थानिक निवड समितीमार्फत निवड केलेल्या उमेदवारांच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. स्थानिक निवड समितीद्वारे एका महाविद्यालयाचा एकच प्रस्ताव प्राप्त होईल, याची संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेने दखल घ्यावी.

२) महाविद्यालये/परिसंस्थांकडून ज्या उमेदवारांची २०२१–२२ या शैक्षणिक वर्षासाठी स्थानिक निवड समितीमार्फत निवड होऊन विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला असेल असे उमेदवार किंवा ज्यांना शिक्षक मान्यता मिळाली असेल असे शिक्षक त्यांनी महाविद्यालये/परिसंस्था सोडली असेल तर अशा उमेदवारांच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन भरण्यासाठी शैक्षणिक विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन संबंधित महाविद्यालयासाठी (सोडून गेलेल्या शिक्षकांना संबंधित महाविद्यालयाने/परिसंस्थेने कार्यमुक्त केल्याचे रितसर पत्र असेल तरच) संकेतस्थळ खुले करण्यात येईल.

३) तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारांच्या मान्यतेचे प्रस्ताव मा. शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचे दि. २५/०२/२०२१ च्या पत्रानुसार महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये ज्या अध्यापकांच्या तासिका तत्वावरील नियुक्त्या विहित मार्गाने झालेल्या आहेत, त्या अध्यापकांना अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात केवळ सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापुरतेच मुदतवाढ देण्यासंदर्भात प्रचलित नियमातील विहित तरतूदी विचारात घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(कृ. मागे पहा)

४) मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे दि. २७/०६/२०२१ च्या पत्रानुसार संलग्नित अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयातील दि. ०१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित मा. सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अनुज्ञेय केलेल्या कार्यभारानुसार तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्या संदर्भात विहित प्रक्रिया पार पाडण्याची कार्यवाही शैक्षणिक वर्ष २०२१–२२ सुरू होण्यापूर्वी करण्यात यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
जा. क्र. सीसीओ/ १९३२
दि. ७ जुलै , २०२१

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक

महाराष्ट्र शासन
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७, डॉ.डॉ. आंबेडकर रोड पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/तासिका/नाहप्र/२०-२१/२०२१/ ८६३ दि.२५-०२-२०२१

महत्वाचे/ई-मेलद्वारे

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- घडयाळी तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नेमणूकीस ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करणेबाबत...

संदर्भ:- १) या कार्यालयाकडील समपत्र क्र.८०४, दि.२२-०२-२०२१.
२) शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१९/मशि-५, दि.२३-०२-२०२१.
३) मा.संचालनालयाकडील क्र.तातप-१५२१/प्र.क्र.०७/मवि-१/२२६२, दि.२४-०२-२०२१.

उपरोक्त विषयाबाबतचे या कार्यालयाकडील संदर्भ क्र.१ येथील पत्र रदद समजण्यात यावे.

या संदर्भात संदर्भ क्र.२ व ३ अन्वये प्राप्त झालेले संदर्भिय शासन / संचालनालयाकडील पत्र पहावित.(प्रती संलग्न)

सदरहू पत्रान्वये आपल्या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्या अध्यापकांच्या तासिका तत्वावरील नियुक्त्या विहित मार्गाने झालेल्या आहेत, त्या अध्यापकांना अत्यंत तातपुरत्या स्वरुपात केवळ सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापुरतेच मुदतवाढ देण्यासंदर्भात प्रचलित निमयातील विहित तरतूदी विचारात घेऊन योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त संदर्भिय पत्रातील सूचनांच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

(डॉ.मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

सोबत:- वरीलप्रमाणे.

प्रत:-
मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्राचार्य
के. जे. सोमैया कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, कोपरगांव

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२१११, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३१ फोन नं.०२०/२६१११११५३

क्रमांक -तातप-१५२१/प्र.क्र.०७/मवि-१/ 7347 दिनांक २७.०६.२०२१

प्रति,

१.सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य
२.कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय- तासिका तत्वावरील अध्यापकांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील नियुक्तीबाबत.**

संदर्भ- १.मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांची दि.२७.०६.२०२१ रोजीची जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे येथील बैठक.
२.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/(१८५/१८)मशि-३,दि.१४.११.२०१८

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये,राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयात सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणूका करणेबाबत विविध संघटना यांचेकडून निवेदने संचालनालयास प्राप्त झालेली आहेत.

त्यानुसार,अधिनस्त अकृषि विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील दि.०१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारीत सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अनुज्ञेय केलेल्या कार्यभारानुसार तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्या संदर्भात विहित प्रक्रिया पार पाडण्याची कार्यवाही शैक्षणिक वर्ष २०२१-२२ सुरु होण्यापूर्वी करण्यात यावी.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - १

प्रत-

१.स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
२.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

Scanned by CamScanner